**विषयः-** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना **(लग्न समारंभाकरिता प्रमाणीत कार्यप्रणाली (SOP) बाबत )**

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१ /कोरोना/सीआर-
दि. १३/०५/२०२०

वाचाः- १) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.५८ /आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.
२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२० व दिनांक ०२ मे २०२०.
४) या कार्यालयाचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रतिबंधीत आदेश क्र.२०२०/आरबी-१/डे-२/टे-४/सिआर-१३ दिनांक ०३.०५.२०२०.

**आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० रोजी अधिसुचना निर्गमित केली आहे. त्यानुसार मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

आणि ज्याअर्थी जिल्हयातील विविध स्तरावरुन लॉकडाऊन कालावधीत लग्न समारंभाच्या परवानगी अनूषंगाने विचारणा होत आहे.

त्याअर्थी नांदेड जिल्हयात सर्व जाती-धर्माच्या लग्न समारंभास सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील संदर्भात नमूद अधिसूचना व कारोना विषाणूचा प्रादुर्भाव रोकण्याच्या अनूषंगाने खबरदारीचा उपाययोजना विचारात घेता लग्न समारंभाच्या ठिकाणी २० व्यक्ती पेक्षा जास्त व्यक्ती उपस्थित राहणार नाही, लग्नाच्या ठिकाणी सर्वांनी चेह-यावर मास्क लावणे, सामाजीक अंतराचे नियम पाळणे, हॅन्डवॉश, सॅनिटायजर्स चा वापर करणे, सर्व वस्तू/ठिकाणे लग्नाचा विधी संपल्यानंतर निर्जतूकीकरण करणे गरजेचे असेल व उक्त रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या प्रमाणीत कार्यप्रणाली आणि या कार्यालयाने वेळोवेळी काढलेल्या प्रतिबंधात्मक आदेशातील नमुद अटी व शर्ती यांचे पालन करणे बंधनकारक असेल या अटीवर जिल्हयातील **प्रतिबंधीत क्षेत्र** (Containment zone) वगळून उर्वरित क्षेत्रासाठी सकाळी ०७.०० ते सायं.०५.०० या कालावधीत वर,वधुच्या निजी निवास्थानी किंवा सबंधिताचे नातेवाईक यांच्या निजी जागेतच लग्न समारंभास मुभा देण्यात येते.

असे लग्न समारंभाच्या अनूषंगाने लग्नाचा दिनांक, स्थळ, वेळ इत्यादी बाबतची पुर्व माहिती सबंधितांनी लगतच्या पोलीस स्टेशन, स्थानिक स्वराज्य संस्था यांना देणे आवश्यक असेल.

Scanned with CamScanner

सदर आदेशाची सबंधित उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सबंधित पोलीस निरीक्षक यांनी अंमलबजावणीची वेळोवेळी खात्री करावी.

आणि असेही आदेशित करीत आहे की, जे कोणी व्यक्ती, समुह सदर आदेशाचे उल्लंघन करील, त्यांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये व भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३. पोलीस अधीक्षक, नांदेड
४. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
५. सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

OFFICE OF THE COLLECTOR
NANDED

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

Scanned with CamScanner